महाराष्ट्र शासन

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय , हिंगोली

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, हिंगोली

Phone No. 02456-299200 Email.-gmchingoli@gmail.com

जा.क्र.शावैमहिं/आस्था १-२/थेटमुलाखत/जाहिरात 3133 /२०२६ दि. 29/10 /२०२६

- जाहिरात -(Walk-In-Interview)

विषय:-अभ्यागत अध्यापक (Visiting Faculty) या संवर्गातील रिक्त पदे थेट मुलाखतीद्वारे एकत्रित मानधनावर भरणे बाबत . . . .

संदर्भ :- १. सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्रं.समिती-२०२५/E-९६४०८७/MJPJAY & AB-PMJAY दि.१४.१०.२०२५

२.वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग शासन निर्णय क्रं.MEDD-१२/२६/२०२६-MMD(Vais-२)/ १५७४७९१ दि.१३.०३.२०२६

३. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग शासन शुध्दिपत्रक क्रं.MEDD-१२/२६/२०२६-MMD(Vais-२)/ १५७४७९१ दि.२३.०३.२०२६

४. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग शासन निर्णय क्रं.संकीर्ण-११२५/प्र.क्रं.४१७/प्रशासन-२ दि.०१.०७.२०२६

५. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग पत्र क्रं.MEDD-१२/२६/२०२६-(Vais-२) MMD (Vais-२)/ई-१५७४७९१ दि.१५.०७.२०२६

६.या कार्यालयाचे आदेश क्रं.शावैमहिं/लले/२०२१/२०२६ दि.१९.०५.२०२६

उपरोक्त संदर्भिय विषयानुसार शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, हिंगोली या संस्थेतील खालील नमुद विषयातील अभ्यागत अध्यापक हि पदे भरण्यासाठी पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. अभ्यागत अध्यापक (Visiting Faculty) या पदाचे अर्ज स्विकृत करुन पात्र उमेदवारांचे अर्जाची छाननी केल्यानंतर उपरोक्त संदर्भ क्रं.२ च्या शासन नियमातील तरतूदीच्या अधिन राहून निव्वळ मानधन तत्वावर भरण्याकरीता संस्थेच्या जाहिरात फलकावर तसेच संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करण्यात येत आहे. मुलाखत **दि.१७ /११ /२०२६ (मंगळवार)** रोजी सकाळी **११.०० वाजता** व पुर्ण रिक्त पदे भरल्या जाईपर्यंत थेट मुलाखतीने भरण्यात येणार आहे. संबंधीत विभागाची सर्व रिक्त पदे भरल्यानंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही . पात्र उमेदवारांनी अर्ज व आवश्यक त्या कागदपत्रासह थेट मुलाखतीकरीता स्वखर्चाने उपस्थित राहावे. तसेच जे उमेदवार अन्य शासकीय/खाजगी संस्थेत/वैद्यकीय महाविद्यालयात कार्यरत आहेत त्यांनी संबंधित संस्थेकडुन ना-हरकत प्रमाणपत्र व नियुक्ती आदेशाच्या छायांकीत प्रती जोडाव्यात.

या संस्थेतील वरिल नमूद सर्व अभ्यागत अध्यापक या पदांचा संदर्भ क्रं.२ च्या शासन नियमातील तरतूदीच्या अधिन राहून निव्वळ मानधन तत्वावर तात्पूरत्या स्वरुपात भरावयाच्या पदांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

अ.क्र.	विषय	शैक्षणीक अर्हता	रिक्त पदे
अभ्यागत अध्यापक			
१	**औषधवैद्यकशास्त्र**	राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या मानकानुसार	२
२	**शल्यचिकीत्साशास्त्र**		२
३	**स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र**		२
४	**कान, नाक व घसाशास्त्र**		१
	एकून		०७

(अ) शैक्षणीक व इतर अर्हता

१. वयोमर्यादा-७० वर्षापेक्षा जास्त नसावे

२. एमडी/एम.एस./डीएनबी संबंधित विषयातील मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी.

३. एम.एम.सी. रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र (पदव्युत्तर अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेल्या/झाल्याचे नोंदीसह)

(ब) अर्जासोबत सादर करावयाची कागदपत्रे (व्दिप्रतीत):-

1.Aadhar Card, Pan Card, SSC Certificate/Birth Certificate

2.MBBS Degree Certificate, MD/MS/DNB Degree Certificate

3. MMC Registration, MMC Additional qualification Registration

(क) जाहिरातीमधील मजकुरात बदल करण्याबाबत :-

या जाहिरातीमधील कोणत्याही मजकुरात उदा.अटी/नियम/शर्ती/पदसंख्या इत्याही मध्ये कोणताही बदल करण्याचे अधिकार अधिष्ठाता यांनी राखुन ठेवले आहेत. तसेच एखादे पद भरणे अथवा रिक्त ठेवणे या बाबतचे अंतिम निर्णय/अधिकारही अधिष्ठाता यांना असतील.

टिप :-वरील नमुद केलेल्या पदासाठी अर्ज केलेल्या उमेदवारांनी मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित राहावे. मुलाखत **दिनांक १७/११/२०२६** **रोजी** सकाळी ११.०० वाजता अधिष्ठाता कार्यालय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, हिंगोली येथे घेण्यात येईल. मुलाखतीसाठी स्वतंत्र पत्र पाठविले जाणार नाही याची नोंद घ्यावी. तसेच ज्या उमेदवारांनी या जाहिरातीपूर्वी अर्ज सादर केलेले असतील, त्यांनी सदर जाहिरातीनुसार पुनश्च अर्ज सादर करणे आवश्यक आहे. रिक्त पदांची संख्या कमी अथवा जास्त होण्याची शक्यता नाकारता येत नाही. करिता सर्व अधिकार अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, हिंगोली यांनी राखुन ठेवले आहेत.

(डॉ.श्रीचक्रधर मुंगल)
अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, हिंगोली

प्रति,

१. उपरोक्त संबंधित विषयातील प्राध्यापक व विभागप्रमुख, शा.वै.म., हिंगोली

२. वैद्यकीय अधिक्षक, शा.वै.म. व रु., हिंगोली

३. श्री.कपिल पुंडे,ग्रंथपाल, यांनी सदर जाहिरात संस्थेच्या संकेतस्थळावर तात्काळ प्रसिध्द करावी.

४. सुचना फलक, अधिष्ठाता कार्यालय, शा.वै.म., हिंगोली

५. विद्यार्थी वसतीगृह/ग्रंथपाल, शा.वै.म., हिंगोली

६. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपुर, गोंदिया, यवतमाळ, अकोला, नांदेड, छत्रपती संभाजीनगर, पुणे, मुंबई, कोल्हापुर, सोलापुर, धुळे, मिरज, अंबाजोगाई, लातुर, चंद्रपुर..

<u>प्रतिलीपी :-</u>

१. मा.सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, गो.ते.रुग्णालय संकुल, ९वा मजला, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

२. मा.आयुक्त (वै.शि.), संचालनालय, वै.शि. व सं., मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

३. मा.संचालक, संचालनालय, वै.शि. व सं., मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.